आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
३ फेब्रुवारी २०२५ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- संसदेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरच्या चर्चेला सुरूवात

- केंद्रीय अर्थसंकल्पात रेल्वेसाठी अडीच लाख कोटी रुपयांहून अधिक तरतूद, या वर्षात २०० वंदे भारत आणि १०० अमृत भारत गाड्या सुरू होणार

- ४० टक्क्यांपेक्ष कमी दिव्यांगत्व असलेल्यांनाही लेखनिक सुविधा देण्याचे सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश

- दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी प्रचाराची मुदत संपली, बुधवारी मतदान

**आणि**

- १५ सुवर्णपदकांसह सर्वाधिक ६१ पदक मिळवलेला महाराष्ट्र राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांच्या पदक तालिकेत तिसऱ्या स्थानी

**<><><><><>**

संसदेत आज राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरच्या चर्चेला सुरुवात झाली. लोकसभेत चर्चेला सुरुवात करताना, भाजपा खासदार रामवीर सिंह बिधुरी यांनी नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालच्या सरकारने केलेल्या कामांची आणि लोककल्याणकारी योजनांची माहिती दिली. यावेळी त्यांनी दिल्ली आणि परिसरातल्या रस्त्यांची स्थिती, वायू प्रदूषण आणि सार्वजनिक वाहतूक सुविधामधल्या समस्यांचा मुद्दाही उपस्थित केला. देशात बेरोजगारीचा प्रश्न अद्यापही कायम असून सरकारला तो सोडवण्यात अपयश आल्याची टीका लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आज केली. सकल राष्ट्रीय उत्पादन

१५ पूर्णांक ३ शतांश टक्क्यांवरून १२ पूर्णांक ६ शतांश टक्क्यांपर्यंत घसरलं असून हे गेल्या साठ वर्षांतलं सर्वात कमी उत्पादन आहे, असंही गांधी यावेळी म्हणाले. मेक इन इंडिया ही चांगली कल्पना असूनही तिची अंमलबजावणी करण्यात सरकार अपयशी ठरलं आहे, अशी टीकाही गांधी यांनी यावेळी केली.

<><><><><>

राष्ट्रपतीच्या अभिभाषणावरच्या आभार प्रस्तावावर आज राज्यसभेतही चर्चा झाली. चर्चेला सुरुवात करताना भाजपा खासदार किरण चौधरी यांनी शेतकऱ्यांचं उत्पन्न दुप्पट करण्यासाठी सरकारने महत्त्वपूर्ण पावलं उचलल्याचं प्रतिपादन केलं. राज्यसभेतले विरोधी पक्षनेते आणि काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी या चर्चेवेळी बेरोजगारी, महागाई आणि रुपयाची घसरण हे मुद्दे यावेळी उपस्थित केले. खर्गे यांनी शेतकऱ्यांच्या आत्महत्येवरून केलेल्या टीकेला केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांनी प्रत्युत्तर दिलं. राष्ट्रीय क्राइम रेकॉर्ड ब्युरोच्या आकडेवारीनुसार संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारच्या १० वर्षांच्या काळात आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या राष्ट्रीय लोकशाही आघाडी प्रणित सरकारच्या तुलनेत ५७ टक्क्यांनी जास्त आहे, असं गोयल म्हणाले. तसंच विरोधी पक्ष महाकुंभमेळ्यात घडलेल्या दुर्घटनेचं राजकारण करत असल्याचा आरोपही गोयल यांनी केला. राओआ सरकारच्या गेल्या पाच वर्षांत शेतीतून मिळणाऱ्या उत्पन्नात किरकोळ वाढ झाली असून दर पाचपैकी दोन शेतकरी कर्जबाजारी आहेत, अशी टीका डेरेक ओ ब्रायन यांनी केली.

<><><><><>

त्रिभुवन सहकारी विद्यापीठ विधेयक २०२५ आज लोकसभेत सादर करण्यात आलं. गुजरातमधे आणंद इथं हे विद्यापीठ स्थापन होणार असून

सहकारातून समृद्धी हे उद्दिष्ट गाठण्याच्या हेतूने व्यवस्थापकीय आणि तांत्रिक शिक्षण तिथे दिलं जाईल. केंद्रीय सहकार राज्यमंत्री कृष्णपाल गुर्जर यांनी विधेयक सभागृहात सादर केलं.

<><><><><>

काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याबद्दल केलेल्या वक्तव्यामुळं संसदीय मर्यादांचा भंग झाला आहे, असा दावा करणारी नोटीस भाजपाच्या खासदारांनी राज्यसभेचे अध्यक्ष जगदीप धनखड यांच्याकडे दाखल केली. त्यांचं व्यक्तव्य हे संसदीय नियम, शिष्टाचारांचा भंग असल्याचं यात म्हटलंय. या नोटीशीची दखल घेऊन सोनिया गांधी यांच्याविरोधात कारवाई करावी अशी मागणी या खासदारांनी केली आहे. अशाच प्रकारची नोटीस अपक्ष खासदार राजेश रंजन ऊर्फ पप्पू यादव यांच्या विरोधात भाजपा खासदारांनी लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांच्याकडे दिली आहे.

<><><><><>

**देशातल्या** रेल्वेच्या विकास आणि कार्यक्षमता वाढीसाठी अर्थसंकल्पामध्ये २ लाख ५२ हजार २०० कोटी रुपयांची तरतूद आहे. त्यापैकी नवीन रेल्वे मार्गांसाठी ३२ हजार २३५ कोटी रुपये, मार्गिकांच्या नूतनीकरणासाठी २२ हजार ८०० कोटी आणि रेल्वेमार्गाच्या दुपदरीकरणासाठी ३२ हजार कोटींची तरतूद आहे. १६ हजार २४० कोटींची नवीन रेल्वे मार्गिकांची कामं सुरु आहेत. या आर्थिक वर्षात ५० नव्या नमो भारत गाड्या, १०० नव्या अमृत भारत गाड्या आणि २०० नव्या वंदे भारत गाड्या सुरू करण्याची योजना आहे.

<><><><><>

केंद्रीय अर्थसंकल्पात राज्यात रेल्वेसाठी एकंदर २३ हजार ७७८ कोटी रुपयांची विक्रमी तरतूद केल्याची माहिती रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली आहे. राज्यात एकंदर १ लाख ७० हजार कोटी रुपयांचं काम सुरू असल्याचंही त्यांनी वार्ताहर परिषदेत सांगितलं. या रेल्वे प्रकल्पांसाठी राज्य सरकार, केंद्र सरकार आणि भारतीय रिझर्व्ह बँक यांच्यात करार झाला आहे. त्यानुसार या प्रकल्पांमधला राज्याचा वाटा रिझर्व्ह बँक उचलणार आहे, असंही त्यांनी सांगितलं.

अमृत स्थानक योजनेअंतर्गत राज्यातली नवी १३२ स्थानकं विकसित केली जाणार आहेत. गेल्या १० वर्षात राज्यात एकवीसशे किलोमीटर लांबीचे नवे रेल्वेमार्ग तयार करण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली.

**मुंबई**तल्या मुंबई सेंट्रल, वांद्रे, जोगेश्वरी, वसई, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, परळ, लोकमान्य टिळक टर्मिनस, कल्याण, पनवेल या टर्मिनलची क्षमता वाढवण्यात येणार आहे. याशिवाय तुमसर, वडसा, आमगाव, कळमना या स्थानकांत गोदाम सुरू करणार असल्याचं ते म्हणाले. कोकण रेल्वे मार्गावर दरवर्षी सात ते आठ स्थानकांवर उच्चश्रेणी विश्रामगृह उभारली जातील. ती ताशी ५० रुपये शुल्क देऊन प्रवाशांना वापरता येतील असं कोकण रेल्वेचे अध्यक्ष संतोषकुमार झा यांनी सांगितलं.

**<><><><><>**

राष्ट्रीय महामार्गांवरुन प्रवास करणाऱ्या वाहनांना दिलासा देण्यासाठी केंद्रसरकार एकसमान टोल आकारणी धोरण तयार करण्याचा विचार करत आहे, अशी माहिती केंद्रीय परिवहन आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी दिली. वृत्तसंस्थेला मुलाखत देताना ते बोलत होते. रस्त्यांच्या परिस्थितीविषयी प्रवाशांकडून आलेल्या

तक्रारींची दखल घेऊन सरकार संबंधित कंत्राटदारांवर कठोर कारवाई करत आहे, असं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

दिव्यांग उमेदवारांना कुठल्याही विशिष्ट निकषाची पूर्तता न करता परीक्षेसाठी लेखनिक सुविधा द्यावी, असे आदेश सर्वोच्च न्यायालयानं आज दिले. यापूर्वी केवळ ४० टक्के दिव्यांगत्व असणाऱ्यांना लेखनिक वापरण्याची मुभा होती. लेखनिकांसाठी असलेला वैधता कालावधी वाढवण्याचे निर्देशही न्यायालयानं दिले. एका उमेदवारानं दाखल केलेल्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयानं हे निर्देश दिले. २ महिन्यात या सर्व निर्देशांचं पालन करा, असं न्यायालयानं म्हटलंय.

<><><><><>

दिल्ली विधानसभा निवडणुकांसाठीचा प्रचार आज संपला. एकूण ७० विधानसभा मतदारसंघांमध्ये बुधवारी मतदान होऊन शनिवारी मतमोजणी होणार आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, भाजपा अध्यक्ष जेपी नड्डा, आपचे राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल यांनी आज विविध ठिकाणी प्रचारसभा घेतल्या. पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान, काँग्रेस खासदार प्रियंका गांधी यांनी विविध ठिकाणी रोड शो केले.

<><><><><>

उत्तरप्रदेशात महाकुंभ दरम्यान चेंगराचेंगरीत अनेकांचा मृत्यू झाल्याप्रकरणी जनहित याचिका दाखल करुन घ्यायला सर्वोच्च न्यायलयाने नकार दिला आहे. या ढिसाळ व्यवस्थापनासाठी जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी करणारी याचिका सरन्यायाधीश संजीव खन्ना यांच्या अध्यक्षतेखालच्या पीठासमोर

आली होती. हा सारा प्रकार चिंताजनक आहे मात्र याचिकाकर्त्याने या संदर्भात प्रथम अलाहाबाद उच्च न्यायालयाकडे दाद मागावी, असं न्यायलयानं सांगितलं.

<><><><><>

उत्तर प्रदेशात प्रयागराजमध्ये सुरु असलेल्या महाकुंभमेळ्यात वसंत पंचमीनिमित्त तिसऱ्या अमृत स्नानाला दोन कोटी ३३ लाखांहून अधिक भाविकांनी स्नान केलं. गेल्या आठवड्यात झालेल्या चेंगराचेंगरीच्या पार्श्वभूमीवर आज याठिकाणी चोख बंदोबस्त ठेवण्यात आला असून आजचे अमृत स्नान सुरळीतपणे पार पडले. तसंच उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी त्यांच्या निवासस्थानी उभारलेल्या वॉर रूममधून सुरक्षा परिस्थितीचे नियमित निरीक्षण केलं. १३ जानेवारीपासून सुरू झालेल्या या महाकुंभ मेळ्याला आतापर्यंत ३७ कोटींहून अधिक भाविकांनी पवित्र स्नान केलं.

<><><><><>

३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत आज सातव्या दिवशी विविध संघांनी आपल्या खेळाचं शानदार प्रदर्शन केलं. सेना दल संघानं २२ तर कर्नाटकानं १९ सुवर्ण पदकं मिळवली आहेत. तर महाराष्ट्र १५ सुवर्णासह तिसऱ्या स्थानावर आहे. मात्र २६ रौप्य आणि २० कांस्य पदकं जिंकून महाराष्ट्रानं सर्वाधिक ६१ पदकं जिंकली आहेत. मणिपूर ११ सुवर्ण पदकांसह चौथ्या तर मध्यप्रदेश १० सुवर्ण पदकांसह पाचव्या स्थानावर आहे. तामिळनाडू आणि दिल्लीनंही स्पर्धेत चांगल्या खेळाचं प्रदर्शन केलं आहे. तामिळनाडूने ९ तर दिल्लीने ७ सुवर्ण पदकं जिंकली आहेत. याशिवाय, हरियाणा, पंजाब आणि उत्तर प्रदेशाचे संघ देखील पदकतालिकेत पहिल्या दहा संघामधे आहेत.

<><><><><>

सिरियात एका कार स्फोटामध्ये १९ जण ठार झाले असून १५ जण गंभीर जखमी झाले आहेत. हा स्फोट मानबिज शहराच्या बाहेरील भागात महिला कृषी कामगारांना घेऊन जाणाऱ्या वाहनाजवळ झाला होता.

**<><><><><>**

पाच वर्षांपूर्वी ६ टक्के असणारा देशातला बेरोजगारीचा अंदाजे दर कमी होऊन गेल्या आर्थिक वर्षात तीन पूर्णांक दोन दशांश टक्के झाला आहे, अस केंद्रीय मंत्री शोभा करंदलाजे यांनी लोकसभेत एका प्रश्नाला उत्तर देताना व्यक्त केला. चालू आर्थिक वर्षात प्रधानमंत्री पॅकेजमध्ये जाहीर झालेल्या पाच योजनांचा फायदा सुमारे चार कोटी तरुणांना पुढच्या पाच वर्षांमध्ये होईल, असं त्यांनी सांगितलं.

**//<><><><><>//**